म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ५२८२
५२८२

सं. वाचनालय, ठाणें
विषय व्या.वा.
क्र. ५२८२



मू. त
आणे

# शहाजीची कथा

ऐतिहासिक कथामाला : १ :

का. क्र. - ५२८

# शहाजीची कथा

किंमत आठ आणे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

: मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी.ए. (टिळक),
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २

* * *

सुधारून लिहिलेली
नवी आवृत्ति
ऑक्टोबर १९५५

* * *

## : अनुक्रम :

१. भोसले घराणें
२. बालपण
३. सासरे–जांवई
४. मानानें बोलावलें
५. मोगलांची सरदारकी
६. वतन मिळालें, पण–
७. नवी हिकमत
८. नवी विटी, नवें राज्य
९. महाराज फर्जंद शहाजीराजे
१०. अटक आणि सुटका
११. आदिलशाहास पत्र
१२. बापलेकांची भेट
१३. अखेर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## : १ : भोसले घराणें

बाळांनो, राजपुतान्यांत चितोडचा किल्ला फार प्रसिद्ध आहे. तसेंच चितोडचें राजपूत घराणें प्रसिद्ध आहे. हें राजपूत घराणें सिसोदे वंशाचें. सिसोदे वंशापैकीं कांहीं लोक आपल्याकडे खालीं दक्षिणेंत आले. आज सहाशें वर्षें झालीं या गोष्टीला. दक्षिणेंत हे लोक देवगिरी किल्ल्याच्या आसपास राहूं लागले. सगळेच कांहीं देवगिरी उर्फ दौलताबाद किल्ल्यापाशीं राहिले नाहींत. या सिसोदे लोकांनीं दौंड नजीक हिंगणी, बेरडी, खानवट व जिंती येथील पाटीलकीचें वतन मिळविलें, आणि भोसले असें नांवहि त्यांना मिळालें. म्हणजे सिसोद्यांना भोसले म्हणूं लागले. इंदापूर तालुक्यांतल्या कळसला भोसल्यांनीं पाटीलकीचें वतन मिळविलें. सिन्नर तालुक्यांतल्या वावीला भोसल्यांनीं पाटीलकीचें वतन मिळविलें. मुंगीपैठण व नान्नज येथें पाटीलकीचें वतन भोसल्यांनीं मिळविलें. आणि वेरूळच्या उत्तरेस बनसेंद्र येथील पाटीलकीचें वतन भोसल्यांनीं मिळविलें.

म्हणजे भोसल्यांचीं वतनाचीं गांवें औरंगाबाद, पैठण, अहमदनगर व पुणें या टापूंत होतीं. आणि तीं सारीं गांवें त्या वेळच्या निजामशाहीच्या राज्यांत होतीं.

अशा या भोसले घराण्यांत मालोजी नांवाचा धिप्पाड पुरुष उदयास आला. मालोजीचा जन्म १५५२ मध्यें झाला. मालोजीच्या अगोदरच्या दहाबारा पिढ्या शेती आणि पाटीलकी सांभाळून राहिल्या. मधून मधून नोकरी मिळाली तर हे पाटील लोक कधीं कधीं लढाईवर जात; पण मालोजी शेती आणि पाटीलकी धरून बसला नाहीं.

मालोजी भोसल्यानें सिंदखेड येथील लखूजी जाधवराव यांच्या घोडदळांत नौकरी धरली; पण मालोजी इतका दणकट होता कीं, त्याच्या मांडीखालीं घोडेंच टिकावयाचें नाहीं! पाहा किती बळ होतें मालोजींत! मग मालोजीला लखूजी जाधवरावांनीं आपल्या वाड्यावर नोकरीला ठेवलें. आणि मालोजीचा काळ आनंदांत जाऊं लागला. पण........

मालोजीला मूलबाळ नव्हतें. म्हणून त्याची बायको उमाव्वा फार दुःखी होती. ही उमाव्वा फलटणच्या जगपाळ निंबाळकरांची बहीण. उमाव्वानें मूलबाळ व्हावें

म्हणून अहमदनगरजवळील एका साधूला नवस केला. त्यानंतर तिला दोन मुलगे झाले. त्यांचीं नांवें शहाजी आणि शरीफजी.

शहाजीचा जन्म चैत्र शुद्ध पंचमी, जय संवत्सर, शके १५१६, ता. १८ मार्च १५९४ रोजीं झाला.

याच शहाजी भोसल्याची कथा मी आतां तुम्हांला सांगणार आहें.

* * * *

## : २ : बालपण

होळीचा सण आला. रंगपंचमीचा दिवस होता. सिंदखेडास जाधवरावांच्या वाडयांत बरीच मंडळी जमली होती. जाधवरावांनीं रंगपंचमीचा दरबार भरवला होता. पुष्कळ लोकांना आमंत्रण दिलें होतें. मालोजीला लखूजी जाधवरावांनीं बोलाविलें होतें. मालोजी आणि शहाजी रंगपंचमीच्या दरबाराला आले. ही १५९९ सालांतली गोष्ट. शहाजी पांच सहा वर्षांचा होता. शहाजी दिसायला सुंदर, वागण्यांत चपळ आणि बोलण्यांत चतुर.

यामुळें जाधवरावांचें लक्ष शहाजीकडे गेलें. जाधवरावांनीं शहाजीला आपल्याजवळ बसविलें. जाधवरावांची मुलगी जिजाऊ अगोदरच त्यांच्याजवळ बसलेली होती. जिजाऊचें वय असेल तीन चार वर्षांचें. दरबारांतली मंडळी एकमेकांवर गुलाल टाकीत होती. जाधवरावांच्या बैठकीवर गुलाबाचीं तबकें होतीं. जिजाऊनें मूठ भरली आणि गुलाल शहाजीवर उधळला ! शहाजीनें मूठ भरली आणि गुलाल जिजाऊवर उधळला ! जाधवरावांचें लक्ष मुलांच्या खेळण्याकडे गेलें. जाधवरावांना कौतुक वाटलें. जाधवराव सहज म्हणाले, "हा जोडा मोठा सुंदर दिसतो !" हे शब्द मालोजीनें ऐकले मात्र तो ताडकन् उठून आपल्या जागेवर उभा राहिला आणि दरबारांतल्या मंडळींना म्हणाला, "ऐका हो, जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले."

आपलें सहज विनोदाचें बोलणें मालोजीनें खरें मानलें याचा लखूजी जाधवरावाला राग आला. जाधवरावांच्या बायकोला म्हणजे म्हाळसाबाईला सुद्धां राग आला.

जाधवराव नवराबायको मालोजीला म्हणाले, " आमचें बोलणें खरें मानूं नका आणि आमच्या नादीं लागूं नका. "

मालोजीला फार वाईट वाटलें; पण करतो काय ? गरिबी मोठी वाईट असते. मालोजीनें लखूजी जाधव-रावांच्या बरोबरीचे होण्याचा निश्चय केला. तावडतोब मालोजीनें जाधवरावांकडील नोकरी सोडून दिली. आणि भीमा नदीच्या कांठीं पांडे पेडगांवजवळ त्याची वतनवाडी होती तेथें मालोजी गेला. मालोजीनें आपल्या शेतीवर खूप मेहनत केली. शेतींत अमाप पीक पिकूं लागलें. शिवाय एकदां तर शेत नांगरींत असतां मालोजीला भरपूर द्रव्याचा ठेवा सांपडला ! मालोजीला महादेव पावला ! कारण मालोजी महादेवाची उपासना करीत होता. आणि त्या-बरोबर धरतीमातेची सेवा करीत होता.

भरपूर पैसा हातीं आल्यामुळें मालोजीनें सैन्याची उभारणी केली, म्हणजे पुष्कळ तरणेबांड लोक शिपाई म्हणून नोकरीस ठेवले. पुष्कळ घोडे विकत घेतले. आतां मालोजी मोठा माणूस झाला. लोक मालोजीला फार मान देऊं लागले. मग मालोजीनें वेरूळ येथील घृष्णेश्वर

नांवाच्या महादेवाचें देऊळ पुन्हा बांधलें. घृष्णेश्वराचें देऊळ जुनें झाल्यानें पडावयास झालेलें होतें. तसेंच त्यानें शिंगणापूरला फार मोठा तलाव बांधला. शिंगणापूरला लोक महादेवाच्या यात्रेसाठीं येत. त्यांना पाणी प्यावयास मिळत नसे. मालोजीनें बांधलेल्या तलावामुळें लोकांचे पाण्याचे हाल वांचले. व लोक मालोजीला ' फार भला माणूस ', ' फार चांगला माणूस ' असें म्हणूं लागले. आणि वेरूळपासून शंभुमहादेवापर्यंतच्या भागांत मालोजीचें नांव सगळ्यांना माहीत झालें.

अशा रीतीनें माणूसबळ आणि पैशाचें बळ मालोजी-जवळ भरपूर झालें. अहमदनगरच्या निजामशाहाला मालोजीच्या शिपायांचा उपयोग होऊं लागला. अशी उत्तम घडी मालोजीची बसली. खुद्द निजामशहानें लखूजी जाधवरावांपाशीं शहाजी आणि जिजाबाई यांच्या लग्ना-बाबत मध्यस्थी केली. मालोजी आतां लखूजी जाधव-रावांच्या बरोबरीचा झाला असल्यानें जाधवरावानें लग्नाला होकार दिला. आणि शहाजी आणि जिजाबाई यांचें लग्न मार्गशीर्ष शुद्ध पंचमी शके १५२० मध्यें म्हणजे इसवी

सन १६०५ च्या डिसेंबरांत मोठ्या थाटानें पार पडलें. या वेळीं मालोजीला निजामशाहींतून पांच हजारांची मनसब, शिवनेर आणि चाकण हे दोन किल्ले आणि पुणें व सुपें हे दोन परगणे जहागीर मिळाले. पाहा किती चिकाटी मालोजीच्या अंगीं होती !

* * * *

## : ३ : सासरे-जांवई

लखूजी जाधवराव हे सासरे आणि शहाजी राजे भोसले हे जांवई. जांवयाला सासरा नेहमीं जपत असतो. सासरा-जांवयाला लाडक्या मुलाप्रमाणें वागवीत असतो. पण या सासऱ्याजांवयांत तशी वागणूक झाली नाहीं. कारण सासरे लखूजी जाधवराव हे एका शहाकडे नोकरीला तर जांवई शहाजी भोसले दुसऱ्या शहाकडे नोकरीला असें चाललें होतें. कधीं कधीं सासरे-जांवई एकाच शहाकडे नोकरीला असले तरी ते एकमेकांच्या विरुद्ध पक्षास असत.

एकदां काय झालें. निजामशाहाचा दरबार भरला. अनेक सरदार जमले. लखूजी जाधवराव आले. शहाजी भोसले आले. खंडागळे सरदार आले. दरबाराला जाधवरावांचे मुलगे आले. शहाजी भोसल्यांचे चुलतभाऊ आले. खंडागळ्यांचे भाऊ आले. अनेक सरदार, अनेक मनसबदार आले. दरबार आटोपला. मंडळी घरीं जाऊं लागली. सहजच मोठ्या दारापाशीं गर्दी झाली. गर्दींत खंडागळे सरदाराचा हत्ती बेफाम होऊन माणसें तुडवीत चालला ! हें पाहातांच लखूजी जाधवरावाचा मुलगा दत्ताजी याला राग आला. दत्ताजी जाधव खंडागळ्यावर चालून गेला. दत्ताजीनें हत्तीला व त्याच्या मालकाला वठणीवर आणलें ! यामुळें तेथल्या तेथें दोन फळ्या पडल्या आणि हाणामारीला सुरवात झाली. खंडागळ्याच्या मदतीला शहाजी भोसले व त्यांचे चुलतभाऊ धांवले तेव्हां लखूजी जाधवहि मुलाच्या मदतीला धांवला. या दंगलींत दत्ताजी जाधव व संभाजी भोसले म्हणजे शहाजीचा चुलतभाऊ हे ठार झाले आणि शहाजीला जबर जखमा झाल्या !

सासरे-जांवयाच्या लढाईचा दुसरा प्रसंग पाहाः दिल्लीच्या मोगलबादशाहाला दक्षिणेंतील राज्यें घ्यावयाचीं

अनुक्रम..............
वि भाग..............
क्रमांक
नों. दि. ........



होतीं. दक्षिणेंतील राज्यें घेऊन तीं आपल्या राज्याला जोडायची होतीं. त्यावेळीं दक्षिणेंत अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि गोवळ-कोंड्याची कुतुबशाही अशीं तीन प्रसिद्ध राज्यें होतीं.

अहमदनगरला मलिकंबर नांवाचा चतुर प्रधान होता. मलिकंबर दिल्लीच्या बादशाहाला भारी झाला होता. तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें मोठी फौज जमविली. विजापूरच्या कांहीं सरदारांनीं बादशाहाला मदत केली. यावेळीं लखूजी जाधवराव मोगलांकडून लढायला होता.



मलिकंबर

दिल्लीची फौज उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि विजापूरची फौज दक्षिणेकडून उत्तरेकडे येऊं लागली. दोन्ही फौजांनीं मलिकंबराला मधोमध गांठण्याची तयार केली. यावेळीं मलिकंबराच्या मदतीला शहाजी भोसले होते. पाहा त्यांनीं काय युक्ति केली ती.

अहमदनगरपासून दहा मैलांवर भातवडीची गढी आहे. तेथें मलिकंबराचें सैन्य गेलें. गढीजवळ मोठा तलाव होता. तो मलिकंबरानें फोडला. त्यामुळें साऱ्या रस्त्यावर चिखलच चिखल झाला! मोहीम पावसाळ्यांत सुरू झाली होती. बाहेरून धान्य येण्याच्या वाटा मलिकंबराच्या सैन्यानें अडवून टाकल्या. त्यामुळें मोगल सैन्याला दाणागोटा मिळेनासा झाला. मोगलांचें सैन्य उपाशी राहूं लागलें. विजापूरच्या सैन्यानें आणि मोगलाच्या सैन्यानें मलिकंबरावर आणि शहाजीवर चाल केली; पण त्यांत मोगल सैन्याचा आणि विजापूरच्या सैन्याचा पराभव झाला. ही गोष्ट इसवी सन १६२४ ची. म्हणजे या वेळेला शहाजी तीस वर्षांचा अगदीं तरुण होता. या लढाईत विजापूरचा सेनापति मुल्ला महमद लारी मारला गेला. त्यामुळें विजापूरची सेना धूम ठोकीत पळून गेली! मोगलाला मिळालेले राजा ढुंढीराज उदाराम ब्राह्मण, दादाजी विश्वनाथ, लखूजी जाधवराव यांचा पराभव झाला. आणि मलिकंबराच्या बाजूचे शहाजीराजे भोसले शहाजीचे सात चुलतभाऊ, विठूजी काटे, हंबीरराव चव्हाण या सरदारांना जय मिळाला.




भातवडीच्या लढाईत शहाजीचा पराक्रम

शहाजीचा पराक्रम पाहून मलिकंबराला वाटलें शहाजी आपल्याला डोईजड होईल. शहाजीच आपली वजिरी म्हणजे प्रधानकी घेईल आणि अहमदनगरच्या निजामशहाचा वजीर होईल. यामुळे मलिकंबर व शहाजी यांच्यांत खटके उडूं लागले म्हणजे सासरे-जांवयाचें वांकडें आलें आणि प्रधान व सरदार यांचेंहि वांकडेंच आलें. यामुळें शहाजीराजांनीं निराळाच मार्ग धरला. ते १६२५ त विजापूरच्या आदिलशाहास जाऊन मिळाले.

* * * *

# मानानें बोलावलें



शहाजी

शहाजी राजे १६२५ त विजापूरच्या आदिलशाहाच्या चाकरीस गेले. पण नंतर दोन वर्षांत म्हणजे इ. स. १६२७ सालीं विजापूरचा राजा इब्राहिम आदिलशाहा मरण पावला. पण आदिलशाहा व निजामशाहा यांच्यांत लढाई चालूं होती. कोंकणांतला दाभोळ प्रांत घेण्याबद्दल ही लढाई चालूं होती. विजापूरकरांच्या बाजूनें कान्होजी जेधे चाल करून आला होता. निजामशाहाच्या बाजूनें लढायला कोणीच मातबर सरदार नव्हता. तेव्हां निजामशाहा मुर्तुजा यानें शहाजीला विजापुरांतून परत आपल्याकडे नोकरीस बोलावलें. कारण मलिकंबर हा इ.स.१६२६त मरण पावला होता. आणि निजामशाहाकडे दुसरा कोणी शूर सरदार नव्हता. तेव्हां शहाजी राजे आदिलशाहींतून परत निजामशाहींत आले. निजामशाहीचा राजा मुर्तुजा खूष झाला आणि त्यानें शहाजी राजांना पुणें प्रांताची जहागीर पुन्हां परत दिली. शहाजीनें पुणें प्रांताची जहागीर इ. स. १६२८ सालीं

आपल्या ताब्यांत घेतली. वेळ पडल्यास मोठी थोरली जहागीर सोडून देण्याची शहाजी राजांची तयारी होती आणि ती परत घेण्याची हिंमत देखील त्यांच्याजवळ होती हें यावरून उघड दिसतें.

* * * *

## : ५ : मोगलांची सरदारकी



शहाजहान बादशाहा

दिल्लीचा बादशाहा शहाजहान दक्षिणेंतील राज्यें घ्यायला टपून होता. त्यासाठीं शहाजहाननें इकडे सरदार पाठविले होते; पण ते कंटाळून जाऊन इकडेच रमून जात. तेव्हां खुद्द शहाजहान बादशाहा दक्षिणेंत आला. यावेळीं शहाजी राजे भोसले हे निजामशाहाचे मुख्य सरदार होते.

शहाजहान बादशाहानें आदिलशाहाची मदत मागितली. आदिलशाहानें रणदुल्लाखान आणि कान्होजी जेधे यांस मदतीस पाठविलें. आणि या सगळ्यांनीं निजामशाहाचें शिरवळ घेतलें. (इ. स. १६२९)

दोन वर्षे शहाजहान बादशाहा बऱ्हाणपूरला राहिला. यावेळीं दक्षिणेंत फार मोठा दुष्काळ पडला. लोकांचे थवे रस्त्यांतून हिंडूं लागले. आणि 'पोटास तरी घाला, नाहीं तर मारून तरी टाका' असें ओरडूं लागले.

या सुमारास म्हणजे इ. स. १६३१ त शहाजहान बादशाहाची बायको मरण पावली. त्यामुळें दक्षिण जिंकावयाचें काम बादशाहानें पुन्हां सरदारांवर सोपविलें.

शहाजीराजे निजामशाहाकडे आल्यानें विजापूरकरांचा त्यांच्यावर राग झाला व विजापूरच्या सरदारांनीं इ. स. १६३० त पुण्याचा कोट पाडला, शहाजीचे वाडे जाळले आणि लूट केली आणि आदिलशाहातर्फे भुलेश्वरच्या डोंगरावर दौलत मंगळ किल्ला बांधून तेथून पुणें प्रांताचा कारभार सुरू केला. म्हणजे शहाजीराजांना त्यांच्या जहागिरींत पाय ठेवायला जागा राहिली नाहीं ! एवढीं दहावीस वर्षे केलेली खटपट पार धुळीला मिळाली ! राजांना फार वाईट वाटलें ! बरें, इकडे निजामशाहानें बोलावलें, पण त्याच्या बोलांत खरेपणा नाहीं. नेहमीं दारूच्या नशेंत ! लखूजी जाधवरावांचा निजामानें कपटानें

खून केला होता. तेव्हां शहाजी राजांना काळजी वाटूं लागली. म्हणून शहाजीराजे दोन हजार स्वार घेऊन बादशाहाच्या आजमखान नांवाच्या सरदाराच्या भेटीला शेवगांवजवळ गेले. हें कळतांच बादशाहाला आनंद झाला. बादशाहानें शहाजी राजाला पांच हजारांची मनसब आणि इतर मान दिले. ( इ. स. १६३० ) अशा रीतीनें शहाजी-राजे दिल्लीच्या बादशाहाचे सरदार झाले.

* * * *

## : ६ : वतन मिळालें पण—

शहाजी भोसले दिल्लीच्या बादशाहाला जाऊन मिळाले. त्यामुळें निजामशाहाचा धीर खचला. निजाम-शाहाच्या ताब्यांतलें नाशिक व संगमनेर मोगलांनीं जिंकलें आणि मोगलांनीं हीं दोन्ही गांवें शहाजीला दिलीं. शहाजी भोसले पुन्हां आपली जहागीर बळकट करण्याच्या मागें लागले. ( इ. स. १६३१ )

पण विजापूरच्या आदिलशाहानें आपलें धोरण बदललें. अहमदनगरचा निजामशाहा आणि विजापूरचा आदिलशाहा हे एक झाले. दिल्लीचा बादशाहा दोन्ही राज्यें घेण्यास टपला आहे याची त्यांना खात्री पटली

म्हणून आदिलशाहा आणि निजामशाहा एक झाले. हें समजल्याबरोबर मोगलांनीं आपलें धोरण बदललें. मोगलांनीं म्हणजे दिल्लीच्या बादशाहानें निजामशाहाच्या राज्यांत आणखी फोडाफोड सुरूं केली.

फत्तेखान नांवाचा निजामशाहाचा मेहुणा होता. शहाजी मोगलाला मिळाल्यानंतर निजामशाहींत फत्तेखानाला महत्त्व आलें होतें. या फत्तेखानाला मोगलांनीं वश करण्यासाठीं शहाजी भोसले यांची सगळी जहागीर काढली; आणि ती जहागीर फत्तेखानाला देऊन टाकली.

जहागीर गेल्यानें शहाजी राजे फार संतापले. सुमारें दोन सव्वा दोन वर्षें ते मोगलांकडे होते. स्वतःच्या जहागिरीची नीट व्यवस्था लावून मानानें राहतां येईल, यासाठीं ते मोगलांकडे गेले; पण तेथें शहाजी भोसले यांची निराशा झाली. मग पुन्हां परत ते निजामशाहाकडे आले.

पुन्हां मोगल आणि निजामशाहा यांची लढाई सुरूं झाली. मोगलांचा सरदार महाबतखान शहाजी भोसले यांच्या पाठीस लागला. शहाजी भोसले कांहीं ऐकेनात. म्हणून महाबतखानानें शहाजीची बायको जिजाबाई व मुलगा शिवाजी यांस कैद करण्याचें ठरविलें.

जिजाबाई व शिवाजी जुन्नरच्या किल्ल्यावर होते. महाबतखानानें म्हालदारखानाला जुन्नरला पाठविलें. म्हालदारखानानें जिजाबाईला कैद केलें. पण शिवाजी त्याला सांपडला नाहीं. जिजाबाईनें शिवाजीला गुप्तपणानें शिवापूरला पाठवून दिलें होतें. मोगलांचें आणि शहाजी भोसले यांचें वांकडें आल्याचें जिजाबाईला माहीत होतें. म्हणून जिजाबाईनें इतकी खबरदारी घेतली होती.

जिजाबाईचा चुलता जगदेवराव जाधव मोगलांकडे नोकरीस होता. जाधवानें महाबतखानाला कळवलें, "शहाजी व जिजाबाई यांचें मुळींच पटत नाहीं. शहाजीनें दुसरी बायको केली आहे. जिजाबाई शहाजीजवळ नांदत नाहीं. जिजाबाईला कैदेंत ठेवल्यास शहाजीला कांहींच दुःख होणार नाहीं; पण जाधव घराण्याचा अपमान होईल तर जिजाबाईला सोडून द्या." यामुळें मोगलांनीं जिजाबाईला सोडून दिलें. (इ. स. १६३३)

* * * *

## : ७ : नवी हिकमत

निजामशाहींतील पूर्वेकडील सर्व भाग मोगलांनीं जिंकला. आणि निजामशाहीच्या गादीवरील हुसेनशाहा याला मोगलांनीं ग्वाल्हेरला तुरुंगांत ठेवलें. (इ. स. १६३३) मोगलांना वाटलें आतां निजामशाही बुडाली ! पण तसें झालें नाहीं. निजामशाहींतील पश्चिमेकडील डोंगराळ मुलूख मोकळाच होता. तो शहाजीनें आपल्या अमलाखालीं आणला. आणि संगमनेरजवळ पेमगड ऊर्फ भीमगड येथें निजामशाहीची राजधानी स्थापली. आणि राजा ? होय, शहाजीनें एक राजाहि तयार केला !

निजामशाहाच्या घराण्यापैकीं मुर्तुजा नांवाचा लहान मुलगा होता. त्याला केले राजा आणि शहाजी झाला त्याचा वजीर ! या हिकमतीमुळें निजामशाहींतील सरदार शहाजीला मिळाले. जुने सरदार शहाजीशीं सरळपणानें वागूं लागले. यावेळीं शहाजीनें गोदावरी, प्रवरा, नीरा, भीमा या नद्यांच्या कांठचा प्रदेश ताब्यांत आणला. सह्याद्रि ताब्यांत घेतला. म्हणजे डोंगरी किल्ले ताब्यांत घेतले,

मराठे सरदारांना नशीब काढण्याची हीच वेळ असें वाटलें. घाटगे, काटे, गायकवाड, कंक, ठोमरे, चव्हाण, मोहिते, महाडिक, खराटे, पांढरे, वाघ, घोरपडे इत्यादि अनेक सरदार शहाजीच्या बाजूला वळले. इतकेंच नव्हे तर विजापूरकरांचा सरदार मुरार जगदेव यालाहि शहाजीनें दोस्त केलें. याच मुरार जगदेवानें १६३० सालीं शहाजीचें पुणें लुटलें होतें, जाळलें होतें!

शहाजीनें आपल्या भरंवशाचे लोक जमवले. फौज ठेवली. किल्ल्यांची डागडुजी केली. गोड बोलून सरदार आपल्या बाजूचे केले. मावळांतील देशमुख वळवून घेतले. आदिलशाहींतील अंमलदार रणदुल्लाखान ऊर्फ रुस्तुम-जमा व मुरार जगदेव यांच्याशीं मैत्री केली. आणि हें सगळें कशाकरितां?

मोगलांनीं नर्मदेच्या खालीं येऊन त्रास देऊं नये म्हणून. तीनशें वर्षें दक्षिणेंत अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही राज्य करीत आहे. त्यांनीं तसेंच राज्य करावें व तें मराठा सरदाराच्या मदतीनें करावें असें शहाजीस वाटत होतें. पण मोगल बादशाहा व त्याचे सरदार यांना तें कसें पटणार?

शहाजी जवळ जवळ दक्षिणेचा मालक बनला; धनी बनला; राजा बनला. ही गोष्ट दिल्लीच्या सरदारांना सहन झाली नाहीं. दिल्लीकरांनीं फोडाफोड सुरूं केली. शहाजीला विजापूरकरांचा आधार मिळत असे. तो बंद करण्याचें दिल्लीच्या बादशाहानें म्हणजे शहाजहान यानें ठरविलें. गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाला सुद्धां बादशाहानें पत्र पाठविलें.

कुतुबशाहा घाबरला व त्यानें दिल्लीच्या बादशाहाला खंडणी देण्याचें कबूल केलें आणि तो सांगेल तसें ऐकण्याचें कबूल केलें; पण विजापूरकर मुळींच घाबरला नाहीं. त्याचा शहाजीच्या शूरपणावर भरंवसा होता.

विजापूरकर ऐकत नाहीं असें पाहून दिल्लीच्या बादशाहानें त्याजवर स्वारी केली; पण मुलख जाळून काढल्यानें मोगलांस अन्नपाणी सुद्धां मिळालें नाहीं !

तेव्हां दिल्लीचा बादशाहा शहाजहान यानें विजापूरला वकील पाठवला. व त्याबरोबर विजापूरच्या आदिलशाहाला

कळविलें कीं, " आम्हांला तुमचें राज्य घ्यावयाचें नाहीं. फक्त तुम्ही शहाजी भोसल्याला आसरा देऊं नका. कारण शहाजी निजामशाही जिवंत ठेवूं पाहातो. शहाजीनें जर निजामशाहीचा राजा आमच्या हवालीं केला तर आम्ही शहाजीच्या वाटेस जाणार नाहीं. मात्र निजामशाहीचें राज्य आम्ही कोणाला पचूं देणार नाहीं. मात्र तुम्हांला ऐंशी लाख उत्पन्नाचा निजामशाहीचा मुलूख देऊं.

लढाई व कांहीं दगदग न करितां निजामशाहीचा ऐंशी लाखांचा मुलूख मिळाल्यामुळें आदिलशाहानें शहाजीची बाजू सोडली! (इ. स. १६३६) आणि शहाजीवर रणदुल्लाखानाला पाठविलें.

या वेळीं शहाजी माहुलीच्या किल्ल्यावर होता. माहुलीचा किल्ला ठाणें जिल्ह्यांत शहापुराजवळ आहे. शहाजीनें कोंकणच्या या डोंगराळ मुलखांत रणदुल्लाखानास चांगलेंच दमवलें. अखेरीस नाइलाज झाला. शहाजीनें बाल निजामशाहाला खानाच्या स्वाधीन केलें. (इ. स. १६३६)

* * * *

## : ८ : नवी विटी, नवें राज्य

बाळांनो, बाल निजामशाहाला विजापूरकरांच्या स्वाधीन करणें शहाजीला भाग पडलें; पण शहाजीची योग्यता विजापूरकर ओळखीत होता. विजापूरकरानें शहाजीस भेटीस बोलाविलें. शहाजी महाराष्ट्रांतून विजापुरास गेला.

शहाजीनें यावेळीं आपला मुलगा शिवाजी यास बरोबर नेलें. विजापूरला गेल्यावर बादशाहानें मुधोळ घोरपड्यांकडील शहाजीची वांटणी दिली.

मुधोळचे घोरपडे व शहाजी भोसले हे भाऊबंद. घोरपडीच्या साहाय्यानें लढाई जिंकली म्हणून मुधोळ-करांचें आडनांव घोरपडे पडलें.

शहाजीला कऱ्हाडजवळचीं सव्वीस गांवें, अर्धा वाई परगणा व कर्नाटकांतील जहागिरीचा निम्मा हिस्सा मुधोळच्या घोरपड्यांनीं दिला. म्हणजे आदिलशाहानें आपल्यापरीनें शहाजीला खूष केलें. शहाजीला खूष करण्याचें कारण शहाजीसारखा शूर सरदार कर्नाटक जिंकण्यासाठीं आदिलशाहास हवा होता.

तुंगभद्रेपासून रामेश्वरापर्यंत ठिकठिकाणीं लहान लहान राजे होते. त्यांना एकएकटे गांठून जिंकणें सोपें होतें; पण हें काम शूर सेनापतीशिवाय होणें शक्य नव्हतें. शहाजी शूर सेनापति होता. शहाजीनें हीं राज्यें जिंकल्यास विजापूरकराला भरपूर संपत्ति मिळणार होती.

शहाजीला कर्नाटक जिंकतांना वाईट वाटत होतें. कारण विजापूरकरांनीं शहाजीवर पुरता विश्वास टाकला नव्हता. पराक्रम करावयाचा शहाजीनें व नांव व्हावयाचें मुसलमान सरदाराचें अशी स्थिति होती !

इ. स. १६३७ ते १६४० पर्यंत रणदुल्लाखाना-बरोबर शहाजीनें कर्नाटकावर तीन स्वाऱ्या केल्या. या तीनहि स्वाऱ्यांत अपरंपार पैसा मिळाला व बराच मुलूख ताब्यांत आला. विजापूरचा महमदशाहा खूष झाला. आणि त्यानें शहाजीला कर्नाटकचा मुख्य सुभेदार म्हणून नेमलें.

कांहीं वर्षें शहाजी बंगलोरास राहिला. नंतर बाळापूर व कोलार येथें शहाजी राहिला. जिंकलेल्या प्रदेशाच्या व वसुलाच्या व्यवस्थेसाठीं शहाजीनें अनेक कुटुंबें

दक्षिणेंतून कर्नाटकांत नेली. पुष्कळ गुणी लोक शहाजीनें कर्नाटकांत नेले. कर्नाटकांतील लोकांना शहाजीनें दुखविलें नाहीं. गोडीनें वसूल केला. विजापुरास पैसा पाठविला आणि स्वतःजवळ सुद्धां भरपूर पैसा सांठवला.

शहाजी बंगलोरास राहून कारभार पाही. शहाजी राजासारखा वागूं लागला. कर्नाटकांतील लोक शहाजीला राजासारखा मान देऊं लागले. आपणहि आतां शहाजीला राजा म्हणूं.

शहाजी राजांजवळ कवि, शाहीर, गवई असे गुणीजन पुष्कळ होते. संस्कृत पंडित होते. बंगलोरास शहाजीचें राज्य सुरूं झालें, असें लोकांस वाटूं लागलें.

शहाजीराजांचें राज्य म्हणजे हिंदूंचें राज्य असा अर्थ लोकांच्या मनांत येऊं लागला. शहाजीराजांनीं जिजाबाईला आणि शिवाजीला कर्नाटकांत नेलें. तेथें जिजाबाई व शिवाजी हे दोन वर्षें होते. (इ. स. १६४० ते १६४२)

एकदां शहाजी राजांनीं चिमण्या शिवाजीला विजापूरला बादशाहाच्या भेटीस नेलें. त्या वेळीं शहाजी राजांच्या स्वारीपुढें बाल शिवाजीची स्वारी होती.

चिमण्या शिवाजीची स्वारी चिमण्या पालखींत ऐटींत बसली होती. पालखीला चिमणे भोई होते, चिमणे चोपदार ललकाऱ्या देत चालले होते. स्वारीबरोबर चिमणीं चिमणीं घोडीं होतीं ! बादशाहाला हा थाट पाहून कौतुक वाटलें. आणि कौतुकाच्या भरांत शिवाजीनें त्याला मुजरा केला नाहीं हें तो विसरला. शिवाजीचा मुसलमानांवर राग म्हणून त्यानें मुद्दामच मुजरा केला नव्हता. बादशाहाला वाटलें, आहे दहा बारा वर्षांचें पोर. नाहीं माहीत त्याला रीतरिवाज, कशाला फार लक्ष घाला !

* * * *

## : ९ : महाराज फर्जंद शहाजी भोसले

बाळांनो, शहाजी राजे विजापुरास शिवाजीला घेऊन बादशाहाच्या भेटीस गेल्यानंतर इकडे कर्नाटकांत बंडाळी सुरू झाली. आपल्याकडे जसे देशमुख, देशपांडे हे वजनदार लोक तसे कर्नाटकांत नायक वजनदार लोक.

शिवाप्पा नायक हा बेदनूरच्या गादीवर होता. तो शूर व अभिमानी होता. शिवाप्पानें स्वाऱ्या करकरून

नवीन नवीन प्रदेश घेतले. तेव्हां महंमद आदिलशाहानें शिवाप्पा नायकावर मुस्ताफाखान व शहाजी यांची रवानगी केली. इक्केरी व सागर येथें तुंबळ लढाई झाली आणि शिवाप्पा नायक शरण आला. (इ. स. १६४४)

चंद्रगिरीस श्रीरंगराय असाच फार पराक्रमी व चतुर पुरुष होता. त्यानें तर जिंजी, तंजावर, मदुरा येथील नायकांची एकजूट केली. आणि पुन्हा विजयनगरचें राज्य उभारण्याची खटपट सुरू केली. तेव्हां गोवळकोंड्याचा कुतुबशाहा आणि विजापूरचा आदिलशाहा यांनीं आपली सेना एके ठिकाणीं केली. आणि वेलोरला श्रीरंगरायाचा पराभव केला. (इ. स. १६४५) तरी सुद्धां तो पुन्हां पुन्हां चढाई करी. तेव्हां श्रीरंगरायाचा पक्का बंदोबस्त करावा म्हणून शहाजीला त्याच्यावर इ. स. १६४७ सालीं पाठविलें. पुन्हां वेलोरपाशीं लढाई झाली. शहाजीनें वेलोरच्या किल्ल्यास वेढा घातला व अचाट पराक्रम करून शत्रूचा पराभव केला. शहानें 'महाराज फर्जंद शहाजी भोसले' असें आदरानें बोलून शहाजीला मोठेपणा दिला.

* * * *

## : १० : अटक आणि सुटका

शहाजीचा मोठेपणा दरबारी लोकांना सहन होत नव्हता. तशांत शहाजीचा मुलगा शिवाजी हा मावळांतील विजापूरकरांचे किल्ले घेऊं लागला होता. शिवाय घोरपडे यांच्याकडून शहाजीनें अर्धा वाई परगणा आणि कर्नाटकांतील जहागिरीचा निम्मा हिस्सा घेतला होता. त्यामुळें घोरपड्यांचा शहाजीवर राग होता. सर्वांत



आणि विजापुरास आणून बादशाहापुढें हजर केलें. ( पृष्ठ ३० )

महत्त्वाचें कारण म्हणजे शहाजीनें गोवळकोंडयाच्या कुतुबशाहाकडे नोकरीस घेण्याचा अर्ज दिला होता. मोगलांकडे सुद्धां शिवाजीचें व शहाजीचें वजन होतें.

एके दिवशीं अगदीं सकाळीं दिलावरखान, खैरातखान, मंबाजी पवार, मंबाजी भोसले यांनीं शहाजीच्या छावणीला वेढा घातला; आणि खंडोजी, बाजी घोरपडे, यशवंतराव गाढवे यांनीं तंबूंत जाऊन शहाजीला झोपेंतून उठवलें. त्यासरशी चकमक उडाली. शहाजी जखमी होऊन बेशुद्ध पडला. मग त्याला बाजी घोरपडयानें कैद केलें आणि विजापुरास आणून बादशाहाकडे हजर केलें.

शहाजी विजापूरकरांकडे दहा अकरा वर्षें होता. अशा पराक्रमी सरदाराला कैद करणें बादशाहाच्या मनांत नव्हतें. बादशाहानें शहाजीला आदरानें वागवलें. दिल्लीच्या बादशाहानें शहाजीची सुटका करण्यास आदिलशाहास सांगितलें. आदिलशाहाला शहाजीशीं गोडीनें वागावयाचें होतें म्हणून त्यानें शहाजीची सुटका केली (इ. स. १६४९) व आदिलशाहानें शहाजीची भेट घेऊन त्याची समजूत काढली. जर आदिलशाहानें

शहाजीच्या सुटकेला वेळ लावला असतां तर कदाचित् कर्नाटकांतील नायक लोक पुन्हां एक होतील आणि शहाजीचा मुलगा संभाजी याला मिळतील अशी त्याला भीति वाटत होती.

शहाजीच्या मनांतील राग काढण्यासाठीं शाहानें शहाजीला पांच लाख होनांची जहागीर दिली.

शहाजीबरोबर पकडलेले कान्होजी जेधे व दादाजी कृष्ण लोहकरे यांची सुद्धां सुटका झाली. शहाजीनें त्यांना मावळांत शिवाजीला मदत जाण्याला सांगितलें. मावळे, देशमुख यांची एकी करायला सांगितलें. सर्वांनीं बेलरोटीवर हात ठेवून शपथा घेतल्या. पोशाख, मानपान देऊन व शिवाजीला देऊन कान्होजी जेधे व दादाजी लोहकरे यांची शहाजी राजांनीं रवानगी केली.

शहाजी राजे किंवा त्यांचे मुलगे यांना ताब्यांत ठेवण्याचें बळच आतां आदिलशाहाजवळ उरलेलें नव्हतें. शहाजीच्या सुटकेच्या वेळीं समजुतीखातर शिवाजीनें कोंडाणा किल्ला विजापूरकरांना दिला इतकेंच. कारण किल्ला परत घेणें हा शिवाजीच्या हातचा मळ होता.

शहाजीचे दुसरे मुलगे संभाजी व व्यंकोजी यांना आदिलशाहा भिऊन होता.

* * * *

## : ११ : आदिलशाहास पत्र.

विजापूरचा महमंद आदिलशाहा इ. स. १६५६ त वारला. त्याबरोबर शहाजीसंबंधीं वातावरण गढूळ झालें. त्यामुळें शहाजीनें आदिलशाहास लिहिलेलें हे बाणेदार पत्र पाहा—

मागें रुस्तुमजमाबरोबर आम्ही माहुलीहून वीस दिवसांत आलों. त्यावेळीं चार लाखांची जहागीर आम्हांस दिली; आणि दरवेळेला पुन्हा पुन्हा ती कायम केली. असें असतां हल्लीं तुम्ही नादान लोकांचे सांगण्यावरून गैर-हिशोबानें हुकूम सोडतां, हें ठीक नाहीं. आम्ही रजपूत लोक आहों. आज पावेतों चार पातशाहींत नोकरी केली.

पण भलतेंच नुकसान सोसून बेअब्रूनें मागें नोकरी केली नाहीं व पुढेंहि करणार नाहीं. आम्ही दीड वर्ष सोसले आदिलशाहा वारले म्हणून गप्प राहिलों. परंतु यापुढे आमची गरज असेल तर आमचा सरंजाम पूर्वीप्रमाणें करून दिला पाहिजे, आणि द्यावयाचा नसेल; तर खुशीनें रजा दिली पाहिजे. इतउत्तर आम्हांस जास्त पराक्रमाचे मामले संपादण्याची हौस बिलकूल राहिली नाहीं. ता. ६।७।१६५७."


* * *

## : १२ : बापलेकांची भेट

शहाजीराजे आतां जवळजवळ स्वतंत्रपणें वागूं लागले. इ. स. १६५८ त कनकगिरीच्या पूर्वेला श्रीशैल मल्लिकार्जुन म्हणून महादेवाचें पवित्र ठिकाण आहे. तें जिंकण्यासाठीं शहाजी राजांनीं आपला मुलगा एकोजी ऊर्फ व्यंकोजी याला पाठविलें. व्यंकोजी हा शिवाजीचा सावत्र भाऊ. तळबीडकर संभाजी मोहित्याची बहीण तुकाबाई हा व्यंकोजीची आई आणि शहाजी राजांची दुसरी बायको. ही नेहमीं शहाजी राजांबरोबर असे.

अनुक्रम
विभाग २३
क्रमांक

शिवाजीनें जसें महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्य सुरू केलें; तसें कर्नाटकांत व्यंकोजीनें करावें अशी शहाजीची इच्छा होती. शिवाजीचे एकामागून एक केलेले मोठ मोठे पराक्रम शहाजीच्या कानांवर गेले होते. बापसे बेटा सवाई निघाल्याचें ऐकून त्याला आनंद होत होता. अशा पराक्रमी मुलांस भेटावयाची त्याला ओढ लागून राहिली. म्हणून शिवाजीला भेटायला शहाजी राजे निघाले. स्वाराबरोबर शिवाजीला निरोप आला. शिवाजीला आनंद झाला.



खंडोबाचें देऊळ, जेजुरी



बापलेकांची भेट.

शहाजी राजे तुळजापुरला आले. देवीच्या पायां पडले. भवानी देवीपुढें त्यांनीं खूप सोनें ठेवलें आणि महाराष्ट्राची भरभराट होवो, अशाबद्दल देवीची प्रार्थना केली. दरकूच दरमजल करीत शहाजी राजे जेजुरीला येऊन ठेपले. दहाबारा वर्षांनीं बापलेकाची भेट होणार होती. म्हणून शहाजी राजे खंडोबाच्या देवळांत गेले. तेथें काशाच्या भल्या मोठ्या पितळींत तूप घातलें होतें.

अनुक्रम २द

त्याच्यांत शहाजी राजांनीं शिवाजीचें तोंड पाहिलें, व शिवाजीनें शहाजी राजांचें तोंड पाहिलें. मग शिवबानें शहाजी राजांच्या पायांवर डोकें टेकलें. तेव्हां शिवाजीला राजांनीं उठवलें व मोठ्या कौतुकानें व प्रेमानें आपल्या लाडक्या बाळाला ते कडकडून भेटले. तेव्हां ही भेट पाहाणारांचे डोळे आनंदानें भरून आले! मग शहाजी व शिवाजी यांना किती आनंद झाला असेल बरें! मग जिजाबाईची राजांनीं भेट घेतली. पालखी तयारच होती. तींत शहाजी राजांना बसविण्यांत आलें. शिवाजीनें वडिलांचे जोडे हातांत घेतलें, स्वतः पालखीला खांदा दिला आणि शिवाजी उतरण्याच्या जागेपर्यंत पायींच आले.

घरीं आल्यावर मोठ्या आदरानें शिवाजीनें शहाजी राजांना बैठकीवर बसविलें. शिवाजी लीनतेनें लांब उभा राहिला. आणि शहाजी राजांची शिवाजीनें पुन्हां पुन्हां क्षमा मागितली. कारण शिवाजीच्या महाराष्ट्रांतील उद्योगामुळें शहाजी राजांना विजापूरकरानें कैद केलें होतें. राजांनीं शिवाजीला म्हटलें, " तूं वागलास तेंच योग्य "



शिवाजीनें वडिलांचे जोडे हातांत घेतले आणि—

अनुक्रम ..........
विभाग ...३८...
क्रमांक ........
नों. दि. ......

शहाजी राजे महाराष्ट्रांत दोन महिने होते. त्या दोन महिन्यांत शिवाजीचा राजासारखा थाट व वागणूक पाहून त्यांना आनंद झाला. शिवाजीनें जिंकलेले किल्ले शहाजी-राजांनीं पाहिले. देशमुख लोकांच्या गांठीभेटी घेतल्या, नजराणे घेतले व दिले. यापुढें कसें वागावें हें सांगितलें. आणि शहाजी राजे परत कर्नाटकांत गेले.

* * * *

## : १३ : अखेर

शहाजी राजे कर्नाटकांत आले. बेदनूरचा नाईक हा विजापूरकरांचा मांडलिक होता. तो विजापूरकरांचें ऐकत नाहींसे झाला. तेव्हां त्यांची खोड मोडण्यासाठीं शहाजी राजांना त्याच्यावर आदिलशाहानें पाठविलें. शहाजी राजांनीं नाइकाची खोड मोडली ! नाईक शरण आला. ही हकीकत विजापूर दरबारला समजतांच आदिलशाहानें शहाजी राजांना पोषाख, हत्ती, घोडे व मानाचें पत्र पाठविलें. शहाजी राजे बेदनुराहून परत यावयास निघाले. वाटेंत तुंगभद्रा नदी होती. बसवपट्टण

नांवाचें मोठें गांव होतें. त्या गांवाजवळ होडगिरी नांवाच्या लहानशा गांवीं शहाजी राजांनीं मुक्काम केला.



घोडा आणि शहाजी राजे दोघेहि जागच्या जागीं संपले.

आसपास जंगल होतें. शहाजी राजांना शिकारीचा भारी नाद. राजे घोड्यावर स्वार झाले व हरणाच्या पाठीस लागले. घोडा धांवत असतां अडचणीच्या जागीं आला व पाय अडकून पडला. घोडा व राजे दोघेहि जागच्या जागीं संपले. ( शनिवार माघ वद्य ५

शके १५८४ ता. २३।१।१६६४) मागून बरोबरचे हाके, शिकारी, सरदार आले. व्यंकोजीला तेथे बोलावून घेतलें. व्यंकोजीनें शहाजी राजांची हिंदुधर्माप्रमाणें क्रिया केली. विजापूरच्या आदिलशाहाला ही बातमी समजली. आदिलशाहानें दुखवटा व मनसबदारीचीं वस्त्रें व्यंकोजीच्या नांवें पाठविलीं.

शहाजी राजे जेथें वारले त्या तुंगभद्रेच्या तीरावर छत्री बांधण्यांत आली. छत्रीच्या बंदोबस्तासाठीं आदिलशाहानें यरगटनहळ्ळी गांव इनाम लिहून दिला. अजून यरगटनहळ्ळी छत्रीच्या खर्चासाठीं इनाम आहे.

संपली शहाजी राजांची कथा. शहाजी राजांनीं एकाच वेळीं महाराष्ट्र आणि कर्नाटक यांत शिवाजी व व्यंकोजी यांना खुबीनें राज्यकारभाराचें शिक्षण दिलें आणि स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची त्यांना स्फूर्ति दिली; म्हणून इतिहासकार शहाजी राजांचें वर्णन 'स्वराज्य-संकल्पक' असें करतात. अशा या शूर पुरुषाला आपण भक्तिभावानें वंदन करूं या.

* * * *

५२८२
बाल-वा.